महावितरण
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५

जा. क्र. औसंवि/ब/ 26774 दिनांक : 24 JUN 2015

# परिपत्रक

**विषय:** MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy चा लाभ पूर्ववत ठेवण्यासाठी कर्मचाऱ्यांना देण्यात येणारा वैद्यकीय भत्ता प्रतिपूर्ती माहे जून २०१५ ते डिसेंबर २०१५ या कालावधीसाठी बंद करणेबाबत.

संदर्भ : सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र. औसंवि/ब/७३१, दि.०८.०१.२०१५

**************

MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy चा लाभ जून २०१५ ते ३१ डिसेंबर २०१५ या कालावधीसाठी पूर्ववत ठेवण्यासाठी कर्मचारी व कुटुंबियांनी सादर केलेल्या विमा रक्कमेच्या दाव्याची सरासरी पाहता अंदाजे रु. ३५ कोटी रक्कमेचा, अधिकचा विमा हप्ता विमा कंपनीस अदा करणे आवश्यक असल्याचे कंपनीने कळविले आहे.

MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy संदर्भात व्यवस्थापन व कामगार संघटना प्रतिनिधी यांनी दि. २३/१२/२०१४ रोजी केलेल्या करारातील मुद्दा क्र. १२ नुसार वैद्यकीय विम्याच्या प्रतिपूर्ती लाभाची रक्कम रु. २० कोटीपेक्षा जास्त झाल्यास सदर योजना त्यापुढील कालावधीकरिता सुरु ठेवण्यासाठी विमा कंपनीस द्यावी लागणारी विम्याची अतिरिक्त रक्कम कर्मचारी मिळून भरतील असे सर्वानुमते मान्य करण्यात आले आहे.

वरील बाब लक्षात घेवून व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांनी संचालक (वित्त) व कार्यकारी संचालक (मासं) यांचेशी विचारविनिमय करुन कर्मचाऱ्यांना देण्यात येणारा रु. २३०/- प्रतिमाह इतका वैद्यकीय भत्ता किंवा त्याऐवजी देत असलेली वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती माहे जून २०१५ पासून ते डिसेंबर २०१५ या कालावधी पर्यंत बंद करण्याबाबत मंजूरी दिली आहे.

**सबब, सर्व क्षेत्रीय कार्यालयांना निर्देशीत करण्यात येते की, कर्मचाऱ्यांना देण्यात येणारा प्रतिमाह रु. २३०/- इतका वैद्यकीय भत्ता माहे जून २०१५ पासून ते माहे डिसेंबर २०१५ या कालावधीमध्ये देण्यात येवू नये. तसेच भत्त्याऐवजी जे कर्मचारी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती घेतात त्यांच्या संदर्भात जून २०१५ ते डिसेंबर २०१५ या कालावधीतून अशी प्रतिपूर्ती देण्यात येवू नये. सदर परिपत्रकाची तातडीने अंमलबजावणी करावी.**

सदर परिपत्रक कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावरील "MSEBHCL Mediclaim" या शिर्षकाखाली उपलब्ध असून त्याची मुद्रांकित प्रत (Hard Copy) प्रसारीत करण्यात येणार नाही. कर्मचाऱ्यांच्या सोयीकरिता सदर परिपत्रक महावितरणच्या Intranet – RAPDRP या संकेत स्थळावरील Industrial Relations Department यावर देखील उपलब्ध आहे.

23.6.2015
(नीलेश र. गटणे)
कार्यकारी संचालक (मासं)

प्रति,
सर्व कार्यकारी अभियंता व तत्सम दर्जाचे अधिकारी यांचेपर्यंत म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादित.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :**
१) व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वितरण कंपनी मर्या., मुंबई.
२) संचालक (वित्त) / (संचालन) / (प्रकल्प), म.रा.वि.वितरण कंपनी मर्या., मुंबई.

**प्रत सस्नेह अग्रेषीत :** कार्यकारी संचालक (मासं), महानिर्मिती / महापारेषण.
- उपरोक्त परिपत्रकाची आपल्या कंपनीअंतर्गत अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आपल्यास्तरावर पुढील कार्यवाही करावी, ही विनंती.

D:\archana\CIRO\Group Mediclaim Insurance Policy 2014 revised\Final Mediclaim Policy 01.01.2015 to 31.12.2015\mdi additional Installment.doc.docx